आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- देशवासियांनी हर घर तिरंगा अभियानात उत्साहाने भाग घ्यावा असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन
- सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली
- गेल्या दशकभरात अवयवदानाच्या प्रमाणात चार पटीनं वाढ

**आणि**

- देशात विविध ठिकाणी पावसाचा जोर/ जनजीवनावर परिणाम

**<><><><><>**

जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं ३२व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. सरकार कृषी क्षेत्रात विविध सुधारणा करत असून यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा हेतू आहे, सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी कृषिक्षेत्र आहे, असं ते म्हणाले. तृणधान्यं, दूध, डाळी आणि मसाल्यांचं सर्वात जास्त उत्पादन भारतात होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशात रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात शाश्वत शेतीवर मोठा भर देण्यात आल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशात कृषिक्षेत्रातलं संशोधन आणि शिक्षणासाठी चांगलं वातावरण

असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यंदा या परिषदेत सुमारे ७५ देशांच्या एक हजारापेक्षा जास्त प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. यावर्षीची परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन’ अशी आहे.

<><><><><>

देशवासियांनी हर घर तिरंगा अभियानात उत्साहाने भाग घ्यावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. येत्या ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान आपापल्या घरांवर तिरंगा फडकावून अभिमानाने स्वातंत्र्यदिन साजरा करावा असं त्यांनी आज समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधे म्हटलं आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून एकता दर्शवणारं हे अभियान गेली दोन वर्षं राष्ट्रीय चळवळ बनल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. आपल्या घरावर फडकणाऱ्या तिरंगी झेंड्याबरोबरचं सेल्फी छायाचित्र काढून हर घर तिरंगा अभियानाच्या संकेतस्थळावर अपलोड करावं असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

<><><><><>

भारतीय स्टेट बँकेनं चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या तिमाहीत १७ हजार ३५ कोटी १६ लाख रूपयांचा निव्वळ नफा कमावला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात एक टक्क्यानं वाढ झाली आहे. या कालावधीत बॅंकेचं एकूण उत्पन्न १ लाख २२ हजार ६८८ कोटी रूपये झाल्याची माहिती बॅंकेनं दिली. तर बॅंकेच्या अनुत्पादक मालमत्तेत घ़ट होऊन ते २.२१ टक्के झालं आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर सज्जतेचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोग जम्मू-काश्मीरच्या

दौऱ्यावर जाणार आहे. हा तीन दिवसीय दौरा ८ ऑगस्टपासून सुरू होईल. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंह संधू यांच्यासह संपूर्ण आयोग जम्मू-काश्मीरला भेट देणार आहे. दौऱ्यादरम्यान आयोग, जम्मू-काश्मीरमधले राजकीय पक्ष, प्रशासकीय आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहे.

**<><><><><>**

विदर्भासह आसपासच्या प्रदेशातील गरीब रुग्णांना सर्व प्रकारचे उपचार मिळावेत, म्हणून नागपूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स कार्यरत आहे. त्यामुळे कुठलाही गरीब रुग्ण उपचारासाठी प्रतीक्षा यादीत राहणार नाही, याची पूर्ण काळजी घ्या, अशी सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज एम्सच्या अधिकाऱ्यांना दिल्या. गडकरी यांनी एम्सच्या कामाचा आणि यंत्रणेच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला.

<><><><><>

गेल्या दशकभरात अवयवदानाचं प्रमाण चार पटीनं वाढलं असून ते आता १८ हजार ३७८ इतकं झाल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी सांगितलं. १४ व्या ‘राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त’ नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ब्रेन डेड रुग्णांचे अवयव दान करणाऱ्या कुटुंबांचा तसंच अशी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणाऱ्या डॉक्टरांचा त्यांनी यावेळी सत्कार केला.

<><><><><>

प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीनं देशभरात ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या ९३६ किलोमीटर लांबीच्या ८ महत्त्वाच्या राष्ट्रीय जलदगती कॉरिडॉर प्रकल्पांच्या विकासाला काल मंजुरी दिली. यामुळे देशातली दळणवळण कार्यक्षमता सुधारेल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि देशभरातील रस्तेजोडणी वाढेल. यात महाराष्ट्रातल्या ३० किलोमीटर लांबीच्या आठ पदरी ‘नाशिक फाटा-खेड’ कॉरिडॉरचा समावेश आहे. हा कॉरिडॉर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि चाकण यांसारख्या प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडेल, यामुळे इथल्या आर्थिक विकासालाही गती मिळेल. या निर्णयामुळे देशाच्या आर्थिक वृद्धीला चालना मिळेल आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत महाराष्ट्रासह सहा राज्यांमधल्या ५६ हजार ८०० चौरस किलोमीटर पेक्षा जास्त परिसराला ‘पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र’

म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारने नवीन मसुदा जारी केला आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं जनतेकडून येत्या ६० दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या असून नागरिक esz-mef@nic.in या संकेत स्थळावर त्याची नोंद करू शकतात.

सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम आणि मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास, आदी कामांवर बंधनं येतील, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

देशात विविध ठिकाणी पवसाचा जोर असून अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या दुर्घटना होत आहेत.

लडाख मधे कारगिलच्या कबड्डी नाला परिसरात एक बांधकामावर दरड कोसळून १२ जण जखमी झाले. तसंच राष्ट्रीय महामार्गावर दरड कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम झाला.

उत्तराखंडच्या रुद्रप्रयाग जिल्ह्यात केदारघाटी इथं पावसामुळे अडकलेल्या यात्रेकरूंची तसंच रहिवाशांची सुटका करण्याचं काम सुरु आहे.

हिमाचल प्रदेशातही पुराचा फटका बसलेल्या शिमला आणि मंडी जिल्ह्यांमधे मदतकार्य सुरु आहे. लष्कराची मदतपथकं युद्धपातळीवर बचावकार्य करीत आहेत.

गेल्या २४ तासांत **मध्य महाराष्ट्रा**त काही ठिकाणी जोरदार तर तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस पडला. **कोकण** तसंच **विदर्भात** बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर **मराठवाड्यात** काही ठिकाणी पाऊस पडला.

**मुंबईत** गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर आज पावसानं हजेरी लावली. धरण क्षेत्रांतही दमदार पाऊस झाला. मध्य वैतरणा, मोडकसागर धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. देशात उत्तर झारखंड आणि लगतच्या भागावर अति तीव्र दाबाचं क्षेत्र निर्माण झालं असून ते वायव्य दिशेला सरकत आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात, कच्छ आणि सौराष्ट्रात काही भागात उद्या मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे.

येत्या २४ तासांत पालघर, पुणे, सातारा जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**<><><><><>**

आगामी ८ वर्षात देशातलं २० टक्के शेती क्षेत्र जैविक पद्धतीने कसण्यात येईल, असं नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद यांनी आज आकाशवाणीला मुलाखतीत सांगितलं. चंद यांची मुलाखत आज आकाशवाणी गोल्ड वाहिनीवरुन रात्री सव्वा नऊ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज तिरंदाजी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या दीपिका कुमारीला पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण कोरियाच्या नाम सू ह्येओन हिनं तिच्यावर ६-४ अशी मात केली. तत्पूर्वी, या ऑलिम्पिकमध्ये दोन पदकं पटकावणारी नेमबाज मनू भाकर हिलाही महिलांच्या २५ मीटर एअर पिस्टल प्रकारात कास्यपदकानं थोडक्यात हुलकावणी दिली. दरम्यान, मुष्टियुद्ध स्पर्धेत पुरुषांच्या ७१ किलो वजनी गटात निशांत देव याचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना आज रात्री उशिरा मेक्सिकोच्या प्रतिस्पर्ध्याशी होणार आहे. तर गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत भुल्लर तिसऱ्या फेरीत मैदानात उतरणार आहेत.